**प्रेस नोट** **दि.२६/०३/२०१९**

## लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## २४ तासात गंभीर गुन्हा शिताफिने उघडकिस आणलेबाबत

दिनांक २३/०३/२०१९ रोजी १९/३० वा च्या सुमारास एम.जी. रोड, कुमार प्लाझा कॉर्नरचे जवळ, कॅम्प, पुणे येथे यातील मयत इसम नामे सुलतान सय्यद हा कॅम्प परिसरामध्ये नारळ विक्रीचे व्यवसाय करत होता त्यांने काही महिन्यापुर्वी आरोपी नामे १) अरबाज मोईद्दीन कुरेशी २) फरहाज मोईद्दीन कुरेशी, दोघे रा. गल्ली नं. ०२, भिमपुरा कॅम्प,पुणे यांच्या बहिणीशी प्रेमविवाह केल्याच्या कारणावरुन वरील आरोपींनी संगनमत करुन सुलतान सय्यद याचेवर चाकुने वार तसेच सोडा बॉटल व कोल्ड्रींगच्या बॉटल डोक्यात मारुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन लष्कर पोलीस ठाणे गु.र.नं.१८९/२०१९ भा.द.वि.क.३०२,३४ सह आर्म ॲक्ट क.४/२५,म.पो.का.क ३७(१)(३) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल असे.

गुन्हा करुन यातिल पाहीजे आरोपी नामे (१) फराज मैन्नुद्दीन कुरेशी वय २० रा.८७१/७२ राजेवाडी, नाना पेठ,पुणे (२) जुनेद ईस्माईल कुरेशी वय २० वर्षे रा.१२६७ जाफरीन लेन,कॅम्प,पुणे हे फरार झाले होते त्यांचा कॉल लोकेशन तसेच इतर गुप्त खबरी मार्फतीने तपास केला असता ते नमुद आरोपी हे सोलापूर येथे पळून गेल्याचे समजल्यानंतर तात्काळ तपास पथकाचे पोउनि गज्जेवार व पो.हवा.शितोळे, पो,हवा,थिकोळे, पो.शि.धावडे, पो.शि.पठाण यांना सोलापुर येथे रवाना केले व त्यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेतले व पाहिजे आरोपी नामे ३) मोहमंद अल्ताफ पटेल, ३) अरबाज मोईद्दीन कुरेशी रा. भिमपुरा, कॅम्प,पुणे गुन्हे शाखेनी ताब्यात घेवून पोलीस ठाणेस आणले असता ४ ही आरोपीनां दाखल गुन्ह्यात अटक केली आहे.

सदरची कामगीरी ही पोलीस उप आयुक्त सो परि-१ मा.सहा.पोलीस आयुक्त सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत भोसले सो,पोलीस निरीक्षक गुन्हे,श्रीमती माया देवरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि प्रसाद गज्जेवार, सपोफौ सोनावणे, पो.हवा.३१२५ शितोळे, पो,हवा.५८२६ थिकोळे, पोना २४०० शिंदे, पो.शि.९८२९ धावडे, पो.शि.८८०५ पठाण ,पो.शि.९८१५ भोसले,पो.शि.७३३० राऊत,पो.शि.९८२३ ओलेकर,पो.शि.९८१८ हुवाळे यांनी केलेली आहे.